**महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संचालक संवर्गातील अधिका-यांच्या तात्पुरत्या पदोन्नती व पदस्थापना.**

**महाराष्ट्र शासन**

वित्त विभाग,

शासन आदेश, क्रमांक :- संलेको २०१७/ प्र.क्र. ८४ /कोषा प्रशा-२

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.दिनांक :- १९ मे, २०१८.

**शासन आदेश :** - महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहसंचालक संवर्गातील खाली नमूद केलेल्या अधिकाऱ्यांना संचालक संवर्गात रूपये ३७४००-६७००० अधिक ग्रेड पे ८९०० या वेतनबँडमध्ये, संबंधित अधिकाऱ्यांच्या नावासमोर स्तंभ क्र. ५ मध्ये दर्शविलेल्या पदावर, त्या पदाचा कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून केवळ तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव व सध्याचे पद | मागणी केलेला महसुली विभाग | वाटप केलेला महसुली विभाग | तात्पुरत्या पदोन्नतीची पदस्थापना |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. सतिश शिवाजीराव तडकसे | पुणे | पुणे | प्राध्यापक तथा वित्तीय सल्लागार, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे |
| २ | श्री. संजय चंद्रकांत शहा | कोकण-२ | कोकण-२ | वित्त व लेखा अधिकारी, मुंबई विद्यापीठ |
| ३ | श्री. बाळासाहेब रामनाथ घोरपडे | नाशिक | नाशिक | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, तापी खोरे विकास महामंडळ, जळगांव |
| ४ | श्री. नारायण भास्कर रिंगणे | कोकण-२ | कोकण-२ | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, वांद्रे (प), मुंबई |
| ५ | श्री. श्रीकिशन चुन्नीलाल श्रीरंगम | कोकण-२ | कोकण- २ | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ |
| ६ | श्री. राजेंद्र धर्मराज मडके | औरंगाबाद | औरंगाबाद | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद |

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव व सध्याचे पद | मागणी केलेला महसुली विभाग | वाटप केलेला महसुली विभाग | तात्पुरत्या पदोन्नतीची पदस्थापना |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ७ | श्री. बिभीषण व्यंकटराव तांबडे | नागपूर (नियम क्र. ७) नुसार | महसुल विभाग वाटपातून सूट | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर |
| ८ | श्री. चं. बा. बिवलकर | कोकण-२ | नाशिक | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक |

२. सदर पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अधिन राहून भरण्याबाबत सा.प्र.वि. / १६ ब यांनी दि. २९/१२/२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांनूसार देण्यात येत आहे.

३. सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची असल्याने त्या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

४. सदरचे पद हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेतील असल्यामुळे सदर पदोन्नती / निवडसुची लोकसेवा आयोगाच्या मान्यतेने नियमित करण्यात येईल.

५. वरील अधिका-यांनी आपल्या पदोन्नत पदाचा कार्यभार या आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत त्वरीत स्वीकारावा व तसे केल्याबद्दल कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्र या विभागाकडे पाठवावे. विहित कालावधीत नियूक्ती न स्विकारल्यास पदोन्नतीचे आदेश रद्द करण्यात येतील. तसेच सदर अधिकारी यांनी मत्ता व दायित्व प्रमाणपत्र सादर केल्याची खात्री संचालनालय (ले व को), मुंबई यांनी करावी.

६. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १६/२/२०१८ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रतिनियुक्तीच्या पदावर पदोन्नतीने पदस्थापना दर्शविण्यात आली आहे.

७. सदर अधिकारी यांना महसुली विभाग वाटप नियमावली २०१५ / शासन अधिसुचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही २०१७/ प्र.क्र.११४/कार्या-१२, दिनांक १५ जून, २०१७ मधील अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(शुभांगी शेठ)**
**सहसचिव, वित्त विभाग.**

प्रत -:

१) महालेखापाल १ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

३) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय ,मुंबई *
४) संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई *
५) प्रधान सचिव (ले व को) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६) संबंधित अधिकारी *
७) संबंधित अधिकारी यांचे सध्याचे कार्यालय प्रमुख.*
८) संबंधित अधिकारी यांचे पदोन्नतीच्या पदाचे कार्यालय प्रमुख*.
९) मा. मुख्यमंत्री / मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०) कक्ष अधिकारी,कोषा-प्र.१,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
११) निवड नस्ती. ,कोषा-प्र.२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

* (संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत)